सं. फौ.ख.क्र. ९४३/२००८
सरकार वि. राजेश पांडे
नि.क्र २१ लगत

**अभियोगपक्षातर्फे सा.क्र. ०८ ची शपथेवर जबानी**

माझे नांवः – मनिष विनायक निमजे

अंदाजे वयः – ४६ वर्षे, व्यवसाय– खाजगी नोकरी

राहणारः – न्यु नरसाळा रोड, तह. जि. नागपूर

**सरतपासणीः सरकारतर्फे सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती पल्लवी सोनवाणे यांच्यातर्फे**

१. माझ्याकडे क्वालीस गाडी क्र. एम.एच.३१/बी.बी. ५४७० होती. मला घटनेची तारीख, वर्ष आठवत नाही. मला घटनेबाबत काही माहिती नाही. असे काही घडले नव्हते की, आमच्या वाहनचालकाने मोटारसायकलला धडक दिली होती.

**(साक्षीदार हा त्याच्या पूर्वीच्या जबाबाप्रमाणे साक्ष देत नसल्यामुळे सहाय्यक सरकारी अभियोक्ता यांनी त्यास उलट तपासामध्ये विचारण्यात येणारे सुचक प्रश्न विचारण्याची परवानगी मागीतली. परवानगी देण्यात आली)**

२ हे म्हणणे खरे नाही की, मी राजेश पांडे यांना ओळखतो. हे म्हणणे खरे नाही की, तो माझ्या गाडीवर चालक म्हणून होता. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २९.०१.२००६ रोजी मी आमच्या क्वालीस गाडीने जात असताना हा अपघात झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, हा अपघात मी प्रत्यक्ष पाहिला. हे म्हणणे खरे नाही की, मोटारसायकल चालकाने समोरुन यु टर्न घेतला असता आरोपी राजेश पांडे याने त्याला धडक दिली. हे म्हणणे खरे नाही की, तिथे लोकांची गर्दी झाल्यामुळे आम्ही घाबरुन पळून गेलो. हे म्हणणे खरे नाही की, सदर अपघात हा आरोपीच्या चुकीमुळे झाला होता. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी हा माझ्या गाडीचा चालक असल्यामुळे त्याला वाचविण्यासाठी मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्णः–**

**आरोपीतर्फे उलटतपासणीः– वकील श्री मोहिले यांच्यातर्फे**

**उलटतपास नाकारला.**

**फेरतपास काही नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत.

समक्ष

ठिकाणः कळमेश्वर

**दि. १३.१०.२०२५**

(आर. एल. राठोड)

न्यायदंडाधिकारी प्र.श्रेणी, कळमेश्वर

<u>**प्रमाणपत्र**</u>

मी खात्रीपूर्वक असे कथीत करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम.परमाल (नि.श्रे.)